# महाराष्ट्र शासन
## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल
**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org
दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)

क्र.विसस/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१८/268 दि. 05/02/2018

परिपत्रक

प्रति,
प्राचार्य
सर्व अधिनस्त अनुदानित व विना अनुदानित कला, वाणिज्य,
विज्ञान, विधी व अध्यापक महाविदयालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग

**विषय: राज्य शासनाची उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सन २०१७-१८ अंमलबजावणीबाबत..**

संदर्भ: १. मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिस/राज्य.अल्प.शिष्यवृत्ती /२०१७-१८ /१२७२, दि. ३०.०१.२०१८
२. अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, येथील पत्र क्र. अविवि-२०१६/प्र.क्र.१३०/का-६, दि.१३.१२.२०१७

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, सन २०१७-१८ पासून माहिती व तंत्रज्ञान विभागाने विकसित केलेल्या DBT पोर्टलवर सदर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांचे अर्ज मागविण्यात आले होते. तथापी संदर्भ क्र. २ चे पत्रास अनुसरुन मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संदर्भ क्र.१ चे पत्रान्वये सदर शिष्यवृत्ती योजनेची सन २०१७-१८ मधील अंमलबजावणी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या पध्दतीनेच करावी असे कळविण्यात आलेले आहे.

तसेच राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विभागाकडून इयत्ता बारावी नंतरच्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये (उदा.कला, वाणिज्य आणि विज्ञान पदवी व पदव्युत्तर) शिक्षण घेत असलेल्या **मुस्लिम, शीख, बौध्द, ख्रिश्चन, पारशी, जैन व ज्यू** या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज विद्यार्थ्यांकडून पूर्वीप्रमाणे महाविद्यालयांमार्फत ऑफलाईन पध्दतीनेच घेण्यात यावेत. तसेच याबाबतची नियम व अटींसह सविस्तर माहिती, जाहिरात, विद्यार्थ्यांनी भरावयाचा अर्ज व सोबत जोडावयाची सहपत्रे **www.dhepue.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहेत.

**सन २०१७-१८ साठी या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नविन (Fresh) व नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहेत. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी सदर शिष्यवृत्तीचे अर्ज MahaDBT Portal वर Online पदधतीने भरले आहेत त्या विद्यार्थ्यांनी देखिल Offline अर्ज भरणे आवश्यक आहे.**

तरी सदर योजनेची माहिती/लाभ सर्व पात्र विद्यार्थ्यांना मिळणेसाठी प्राचार्यांनी/संस्थाप्रमुखांनी सदर योजनेबाबतची सर्व इत्यंभूत माहिती महाविद्यालयांच्या दर्शनीभागावरून/सूचना फलकावर प्रदर्शित करावी व त्याबाबत विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे. जेणे करुन सदर या योजनेचा लाभ सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता येईल. सदरबाबत आपल्या महाविद्यालयांतील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज जाहिरातीत दिलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून पात्र विद्यार्थ्यांचेच **अर्ज व सहपत्रांसह सोबत जोडलेल्या प्रपत्र-१ (Excel Sheet) मधील सर्व रकाने पूर्ण व अचूक उदा.**

**विद्यार्थ्यांचे नाव, महाविदयालयाचे नाव, कोर्स फी, शिष्यवृत्तीची रक्कम, Bank A/c No., Bank Name, Branch Name, IFCS व MICR Code तसेच चालू असलेला मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक इत्यादी माहिती बिनचूक भरून (सदर प्रपत्रात कोणताही बदल करू नये) सॉफ्ट तसेच हार्ड कॉपीसह जाहिरातीत दिलेल्या वेळापत्रकानुसार या कार्यालयास सादर करावे.**

**मूदतीनंतर येणाऱ्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. तसेच याबाबत पुढे कोणत्याही विद्यार्थ्याची तक्रार अथवा न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्याचे सर्वस्वी उत्तरदायीत्व आपले राहील याची नोंद घ्यावी.**

सोबत: संदर्भिय पत्र व जाहिरात

RBhosle
-5/2/18

विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रत माहितीस्तव सादर:
मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१.

**Annexure A**

| Sr. No. | Students Name | Parent's Income | College Name & Address | District Name | College Type (Government / Aided / Non Aided / Permentaly Non Aided | Course Stream (Arts, Commers, Science, Law, Education) | Course Type (Porfesstional / Non Professtional) | Course Name (B.A. MA, BCOM, MCOM Etc) | Tution Fee | Exam Fee | Bank Informatiion | | | | | Sanctioned Amount | | | | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | Bank Name | Bank Branch Name | Bank Account Number | I.F.S.C. CODE | Andhar Number | Tution Fee | Exam Fee | Maintance Allowence | Total | |
| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

# उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सन २०१७-१८

शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७/१०/२०१७ व
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ४६५/तांशि-४, दि. १४.०२.२०१८

**अर्ज क्र. (Application ID)**

**वैयक्तिक माहिती (Personal Details)**

| | |
|---|---|
| विद्यार्थ्यांचे नांव (Candidate Name) | |
| वडिलांचे नांव (Father Name) | |
| आईचे नांव (Mother Name) | |
| लिंग (Gender) | |
| जन्मदिनांक (Date of Birth) | |
| जात (Category) | |
| जात प्रवर्ग (Sub-Category) | |
| मातृभाषा (Mother Tongue) | |
| धर्म (Religion) | |
| अर्जदाराचा कुटूंबातील अपत्य क्रमांक<br>(Child number in applicants family) | |
| (सदर योजनेचा लाभ हा कुटूंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित, जुळ्या अपत्यांबाबत तसा उल्लेख करुन शासनाने विहीत केलेले पुरावे सोबत जोडणे आवश्यक)<br>Referral scheme benefits are given to only limited two children & enclosed certificate of twins mentioning government rules. | |
| कायमस्वरुपी पत्ता (Permanent Address ) | |
| दुरध्वनी क्रमांक (Mobile No) | |
| इमेल आय डी (E-Mail ID) | |

**प्रवेशाबाबत माहिती (Admission Details)**

| | |
|---|---|
| प्रवेशित वर्ष (Admission Year) | |
| प्रवेश प्रकार बीएड /एमएड/बीपीएड/एमपीएड/ विधी अभ्यासक्रमांसाठी<br>(Type of Admission For BEd/ MEd/BPEd/MPEd/ Law) | CAP No. |
| संस्थेचे नांव (Institute Name) | |
| संस्थेचा पत्ता (Institute address) | |
| विद्याशाखा (Faculty) | कला / वाणिज्य / विज्ञान / शिक्षणशास्त्र/विधी<br>(Arts/Commcerce/Science/Education/ Law) |
| अभ्यासक्रमाचे नांव (Name of Course) | |
| सध्याचे शैक्षणिक वर्ष<br>(Current Educational Year) | प्रथम / द्वितीय / तृतीय /चतुर्थ / पाचवे |
| अभ्यासक्रम अनुदान प्रकार<br>(Type of Grant for Course) : | शासकीय / अनुदानित / टप्पा अनुदानित - विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित<br>(Government /Aided/Partially Aided - Non-Aided/ Permanently Non Aided) |

**उत्पन्ना बाबत माहिती (Income Certificate Details )**

| | |
|---|---|
| विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न (सन २०१६-१७)<br>(Candidate Parental Annual income (For Financial Year २०१६-१७) | |
| उत्पन्न प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्याचा हुद्दा<br>(Income Certificate Issuing Authority) | |
| उत्पन्न प्रमाणपत्र क्रमांक (Income Certificate Number) | |
| उत्पन्न प्रमाणपत्रावरील दिनांक<br>(Income Certificate Issue Date) | |

**अधिवास / रहिवासी प्रमाणपत्राबाबत माहिती (Domicile Certificate Details)**

| | |
|---|---|
| अधिवास प्रमाणपत्र क्रमांक<br>(Domicile Certificate No) | |
| अधिवास प्रमाणपत्रावरील दिनांक<br>( Issue Date of Domicile Certificate) | |
| अधिवास प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्याचा हुद्दा<br>(Domicile Certificate Issuing Authority) | |

**अर्जदाराचा बँकेचा तपशिल (Candidate Bank Details)**

| | |
|---|---|
| बँकेचे नांव (Name of Bank) | |
| बँक शाखेचे नांव (Branch Name of Bank) | |
| बँक खाते क्रमांक (Bank Account No) | |
| बँक आय.एफ.एस. सी. कोड (Bank IFSC Code) | |
| आधार क्रमांक (Adhar No) | |
| बँक खाते आधार क्रमांकाशी लिंक आहे का ?<br>(Adhar , Is it linked to Bank) | ( होय / नाही)<br>(Yes/No) |

अर्जदाराची स्वाक्षरी व नांव
Student Name and Signature

**संस्थेने भरावयाचा भाग (To be filled by Institute )**

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे संपूर्ण नांव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक<br>(Institute Name Address and Phone No) | |
| २ | सक्षम शिखर संस्था / यंत्रणा / मंडळाकडून (NAAC, इ.) संस्थेस देण्यात आलेले मूल्यांकन व मुल्यांकनाची तारीख.<br>(Date and Grade given by NAAC to Institute) | |
| ३ | विद्यार्थी प्रवेशित अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची पूर्वमान्यता व संबंधित विद्यापीठाची संलग्नता आहे का ?<br>(Is Government Recognition / University Affiliation to Course? | होय / नाही<br>(Yes / No) |
| ४ | विद्यार्थ्यांच्या वर्तणूकी बाबत सर्वसाधारण अभिप्राय<br>(Behaviour of Students ) | |
| ५ | विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती टक्केवारी मध्ये<br>(५० टक्के पेक्षा जास्त उपस्थिती असणे आवश्यक)<br>% of Presence of Student in class<br>(Minimum should be 50%) | |

| | | |
|---|---|---|
| ६ | विद्यार्थी अन्य शिष्यवृत्ती / फी माफी / फी मध्ये सवलत / विद्यावेतन इ. चा लाभ घेतो काय ?<br>लाभ घेत नसल्यास तसे स्पष्ट नमुद करावे.<br>Is Students Getting Benefit of another Scholarship/Concession etc ?<br>If not clearly mention it. | |
| ७ | सस्थेचा प्रकार (Type of Institute) | शासकीय / अनुदानित / टप्पा अनुदानित - विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित<br>(Government /Aided/ Partially Aided - Non-Aided/ Permanently Non Aided) |
| ८ | अर्जदाराच्या प्रवेशित अभ्यासक्रमाचे नांव<br>(Name of Course) | |
| | (विद्यार्थी नापास झाला / एटीकेटी नियमाप्रमाणे पुढच्या वर्गात दाखल केला असल्यास त्याबद्दल स्पष्ट उल्लेख करावा.) | |
| ९ | अभ्यासक्रम प्रकार<br>(Type of Course) | व्यावसायीक / बिगरव्यावसायीक<br>(Professional /Non Professional) |
| १० | शासन नियमानुसार अर्जदारांकडून घेण्यात आलेले शुल्काबाबत माहिती.<br>(Candidates fee detail information as per Govt Rule) | |
| | शिक्षण शुल्क (Tution Fee) | |
| | परिक्षा शुल्क (Exam Fee) | |
| ११ | विद्यार्थ्यांच्या पालकांचे (आई व वडिल यांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न<br>(Candidates parents Annual Income) | |
| १२ | विद्यार्थ्याने अधिवास प्रमाणपत्र सोबत जोडले आहे काय ?<br>(Is Students enclosed Domicile Certificate?) | |
| १३ | शिष्यवृत्ती देणेसाठी प्राचार्याची निश्चित स्वरुपाची शिफारस.<br>(Principal recommendation) | |

(सही व शिक्का)

संस्थाप्रमुख / प्राचार्य / कुलसचिव स्वाक्षरी

दुरध्वनी क्रमांक

**विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**
**(Enclosed Doucments)**

१. मागील वर्षाचे गुणपत्रक (Previous Year Mark Sheet)

२. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र ( Authorized Domicile Certificate)

३. सक्षम प्राधिकाऱ्याकडील उत्पन्न प्रमाणपत्र (Authorized Income Certificate)

४. शैक्षणिक शुल्क, परिक्षा शुल्क महाविद्यालयात भरलेबाबतची पावती (Receipt of Exam Fee & Tuition Fee)

५. बँकेच्या पासबूकची छायांकित प्रत (Xerox copy of Bank Pass Book)
६. आधार कार्ड ची छायांकित प्रत ( Xerox copy of Aadhar Card)

**महत्वाची सूचना (Important instructions)**

१. अर्जामधील सर्व रकाने संपूर्ण व अचुक भरलेले असणे आवश्यक आहे. (All the information duly filled by Candidate)

२. अनाथ मुलांच्या बाबतीत संबंधीत शैक्षणिक संस्थानी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची तपासणी करुन त्याप्रमाणे पात्रतेकरीता प्रमाणित करुन संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना सर्व कागदपत्रांसह शिफारस करावी. अशा प्रकारे प्राप्त शिफारशींच्या आधारे प्रकरणनिहाय तपासणी करुन विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी अशा अनाथ विद्यार्थ्यांना योजनेच्या पात्रतेसाठी प्रमाणपत्र द्यावे.

३. सस्थांनी सदर अर्जासोबत देण्यात आलेले विवरणपत्र 'अ' मध्ये एकत्रितपणे माहिती भरुन विभागीय सहसंचालक कार्यालयांना देण्यात यावी.

४. महाविद्यालय / विद्यापीठाने Covering Letter जोडून सर्व विद्यार्थ्यांचे एकत्रित अर्ज संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडे मुदतीत सादर करणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**
web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१७/ईबीसी ऑफलाईन कार्यवाही/ ९८८४ दि. १५/०२/२०१८
15 FEB 2018

**परिपत्रक**

**विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची सन २०१७-१८ करीता ऑफलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणे बाबत..**

**संदर्भ :** १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७/१०/२०१७
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ४६५/तांशि-४, दि. १४.०२.२०१८

उपरोक्त संदर्भ क्र. २ वरील दि. १४.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार उच्चशिक्षण संचालनालया अंतर्गत राबविण्यात येणारी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून वगळून त्यांची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे करण्यात येत आहे. तथापि संबंधित योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे.

**योजनेंतर्गत लाभाच्या पात्रतेसाठी अटी व शर्ती :-**

१. संदर्भिय शासन निर्णय क्र. २ च्या अनुषंगाने सन २०१७-१८ या कालावधीसाठी MahaDBT Portal च्या तांत्रिक अडचणी मुळे उपरोक्त उच्चशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असणाऱ्या शिष्यवृत्तींचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे.
२. तसेच, ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी MahaDBT Portal द्वारे ऑनलाईन पध्दतीचे अर्ज भरले आहेत अशा विद्यार्थ्यांनीही ऑफलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.
३. विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पध्दतीने शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयात **दि. २८.०२.२०१८** पर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
४. शिष्यवृत्तीसाठी अर्ज करतांना सदर शिष्यवृत्ती साठी शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्तींचे अवलोकन करुनच अर्ज सादर करावा.
५. शिष्यवृत्तीच्या अर्जासोबत जोडावयास सांगण्यात आलेले सर्व आवश्यक कागदपत्रांची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
६. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित खातेवर थेट जमा करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी अर्जामध्ये विहीत ठिकाणी बँकेखाते बाबत माहिती तसेच आधार क्रमांकाबाबतची माहिती अचूक भरावी. तसेच आपल्या **बँकेच्या पासबूकाची प्रथम पृष्ठाची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.**
७. अपूर्ण / चुकीची माहिती भरलेले तसेच अंतिम मुदतीनंतर प्राप्त अर्जांचा शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाणार नाही.
८. शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला म्हणजे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळेलच असे नाही. शासनाने वेळोवेळी निश्चीत केलेल्या अटी व शर्ती पूर्ण करणारे विद्यार्थीच शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरतील.
९. सदर योजनेचा लांभ हा शैक्षणिक वर्ष २०१७-१८ व त्यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे व सध्या विविध शैक्षणिक सत्रात शिकत आहेत अशा महाराष्ट्रातील अधिवासधारक व वादग्रस्त महाराष्ट्र - कर्नाटक सीमा क्षेत्रातील विद्यार्थ्यांसह जे विद्यार्थी विहीत अटी व शर्तींची पूर्तता करतील अशा सर्व पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून पुढे लाभ अनुज्ञेय असेल.
१०. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र प्रत्येक इच्छुक लाभार्थ्यांने अर्जासमवेत सादर करणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

११. सदर प्रयोजनार्थ लाभाकरिता दरवर्षी अर्ज करताना त्यासंबंधीत शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र विचारात घेऊन किमान संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमापणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१२. सदर योजनेचा लाभ हा कुटूंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित असेल.

१३. या योजनेचा लाभ दूरस्थ पध्दतीने (Open /Distance /Virtual Learning) अथवा अर्धवेळ (Part-Time) स्वरुपात चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणार नाही.

१४. सदर योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ हा शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या निवडक पूर्णवेळ अभ्यासक्रमांसाठी शासकीय, शासन अनुदानित, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानावरील - विनाअनुदानित) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये, शासकीय विद्यापीठे आणि शासकीय / अनुदानित अभिमत विद्यापीठे (स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे व खाजगी विद्यापीठे वगळून) या मध्ये प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठीच मर्यादित राहील.

१५. तसेच योजेनच्या लाभाकरीता अनुज्ञेय असलेला अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची पूर्व मान्यता विद्यापीठाची संलग्नता असणे आवश्यक आहे.

१६. वरीलप्रमाणे नव्याने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमांपैकी व्यावसायीक व बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या पध्दतीनुसार प्रवेश घेणे बंधनकारक आहे.

१७. शासनाने विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी केवळ कोणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल.

१८. सदर योजनांतर्गत लाभ घेण्यासाठी संबंधित शैक्षणिक वर्षात इच्छुक अर्जदार विद्यार्थ्यांची प्रवेशित अभ्यासक्रमासाठी किमान ५० टक्के उपस्थिती आवश्यक आहे.

१९. संबंधित विद्यार्थी स्वत:च्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करीत नसल्याबाबत किंवा संबंधित प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय अनियमित असणे अथवा गैरहजर राहणे इ. स्वरुपाचे गैरवर्तन करत असल्याबाबत संबंधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने निदर्शनास आणले तर अशा विद्यार्थ्यांची शुल्क शिष्यवृत्ती थांबविण्यात किंवा रद्द करण्यात येईल.

२०. सदर योजनेंतर्गत पात्र अभ्यासक्रम राबविण्याऱ्या संबंधित शैक्षणिक संस्था (NAAC इ.) इ. मुल्यांकन / पुर्नमूल्यांकन करण्यास पात्र ठरल्यानंतर त्यांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या अखेरपर्यंत सक्षम शिखर संस्था / यंत्रणा / मंडळाकडून असे मूल्यांकन व दर्जाचे मानांकन प्राप्त करणे (Assessment and Accreditation) आवश्यक राहील. तदनंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संबंधित सक्षम शिखर संस्था / मंडळाकडून (NAAC इ.) मूल्यांकन व दर्जा निश्चिती करुन मानांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थांचे मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करणाऱ्या शैक्षणिक संस्थेमध्ये नव्याने प्रथम / थेट द्वितीय वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीताच सदर योजना लागू राहील.

२१. सन २०१७-१८ या वर्षासाठी शिष्यवृत्तीबाबत कार्यवाही करणेसाठी कमी कालावधी असल्याने संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ यांनी सदर शिष्यवृत्तीबाबत तात्काळ विद्यार्थ्यांना सूचना देण्यात येऊन अंतिम मुदतही निदर्शनास आणून द्यावी. तसेच शिष्यवृत्तींचे अर्ज भरणेस विद्यार्थ्यांना सहाय्य करावे.

२२. विद्यार्थ्यांनी संपूर्ण व अचूक अर्ज भरलेला आहे तसेच सोबत सर्व आवश्यक कागदपत्रे जोडलेली आहेत या बाबींची खात्री करुनच संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज संबंधित सहसंचालक कार्यालयांना सादर करणे आवश्यक आहे.

सहसंचालकांनी संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ निहाय प्राप्त झालेल्या पात्र विद्यार्थ्यांची माहिती सोबतच्या तक्त्यात दिनांक १०.०३.२०१८ पर्यंत संचालनालयास सादर करावी.

Scanned by CamScanner

सवलन

सन २०१७-१८ या वर्षासाठी शिष्यवृत्तीच्या कार्यवाहीसाठी कमी कालावधी उपलब्ध आहे. त्यामुळे सदरहू शिष्यवृत्तीच्या ऑफलाईन कार्यवाहीबाबत उपरोक्त सूचना तसेच अंतिम मुदत याबाबत आपल्या अधिनस्त महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांना तात्काळ इमेल, दुरध्वनी, परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात याव्यात. तसेच शिष्यवृत्ती योजनेची पूर्वीप्रमाणे ऑफलाईन पध्दतीने अंमलबजावणी होत असलेबाबत आपल्या विभागातील जिल्ह्यांमधील स्थानिक वर्तमानपत्रामध्ये मोफत बातमी देणेत यावी. शिष्यवृत्तीच्या अर्जांची तपासणी करणेसाठी कँम्प घेणेत यावेत.

संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ यांचेकडून प्राप्त झालेल्या अर्जांची तपासणी करतांना संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता केलेल्या विद्यार्थ्यांना लाभ देय होईल तसेच कोणताही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

दि. ०७.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना द्यावयाच्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची परिगणना करण्यात यावी.

सदरहू शिष्यवृत्तीची रक्कम आपल्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार आपल्या कार्यालयाच्या आर्थिक वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देणेत येईल. सहसंचालक कार्यालयांनी लाभार्थ्यांना देणेत येणारी रक्कम ही थेट स्वरुपात लाभार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| ०१ | विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाकडे ऑफलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची मुदत | २८.०२.२०१८ पर्यंत |
| ०२ | महाविद्यालयांनी सहसंचालक कार्यालयांकडे अर्ज पाठविण्याची मुदत | ०५.०३.२०१८ पर्यंत |
| ०३ | सहसंचालकांनी संचालनालयास माहिती पाठविण्याची मुदत | १०.०३.२०१८ पर्यंत |

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

Scanned by CamScanner

Annexure - A

| Sr. No. | Students Name | Parent's Income | College Name & Address | District Name | College Type (Government / Aided / Non Aided / Permentaly Non Aided | Course Stream (Arts, Commers, Science, Law, Education) | Course Type (Porfesstional / Non Professtional) | Course Name (B.A. MA, BCOM, MCOM Etc) | Tution Fee | Exam Fee | Bank Informatiion | | | | | Sanctioned Amount | | | | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | Bank Name | Bank Branch Name | Bank Account Number | I.F.S.C. CODE | Aadhar Number | Tution Fee | Exam Fee | Maintance Allowence | Total | |
| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१७/ऑफलाईन कार्यवाही/ १८७६ दि. १४/०२/२०१८

16 FEB 2018

परिपत्रक

**विषय :- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शिष्यवृत्ती / आर्थिक सहाय्य योजनांची ऑफलाईन पध्दतीने कार्यवाही करणे बाबत..**

**संदर्भ :-** १. शासन निर्णय क्र. स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२, दि. ०२/०८/२०१७
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७/१०/२०१७
३. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ४६५/तांशि-४, दि. १४.०२.२०१८

उपरोक्त संदर्भ क्र. ३ वरील दि. १४.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार उच्चशिक्षण संचालनालया अंतर्गत राबविणाऱ्या येणाऱ्या खालील शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून वगळून त्यांची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे परंतु संबंधित योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | योजनांची नावे | विभागीय सहसंचालक कार्यालयांकडे सादर करावयाचे अर्ज | संचालनालयास सादर करावयाचे अर्ज |
|---|---|---|---|
| ०१ | हिंदी मधील मॅट्रीकोत्तर अभ्यासासाठी अहिंदी भाषीक राज्यातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती | - | नवीन मंजूरी व नुतनीकरण |
| ०२ | एकलव्य आर्थिक सहाय्य | - | नवीन मंजूरी व नुतनीकरण |
| ०३ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य (AMS) | - | नवीन मंजूरी व नुतनीकरण |
| ०४ | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती | - | नवीन मंजूरी व नुतनीकरण |
| ०५ | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती | - | नवीन मंजूरी व नुतनीकरण |
| ०६ | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती | - | नवीन मंजूरी व नुतनीकरण |
| ०७ | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | नुतनीकरण | नवीन मंजूरी |
| ०८ | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती | नुतनीकरण | नवीन मंजूरी |
| ०९ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती | नुतनीकरण | नवीन मंजूरी |
| १० | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | नवीन मंजूरी / नुतनीकरण | - |
| ११ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | नवीन मंजूरी / नुतनीकरण | - |

- **विद्यार्थ्यांसाठी सर्वसाधारण सूचना :-**

१. संदर्भिय शासन निर्णय क्र. ३ च्या अनुषंगाने सन २०१७-१८ या कालावधीसाठी MahaDBT Portal च्या तांत्रिक अडचणी मुळे उपरोक्त उच्चशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असणाऱ्या शिष्यवृत्तींचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे.

२. तसेच, ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी MahaDBT Portal द्वारे ऑनलाईन पध्दतीचे अर्ज भरले आहेत अशा विद्यार्थ्यांनीही ऑफलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

३. शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणाचे अर्ज भरणेसाठी संबंधित विद्यार्थ्यास मागील वर्षी शिष्यवृत्ती मंजूर असणे आवश्यक आहे.

४. विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पध्दतीने शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयात दि. २८.०२.२०१८ पर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

५. वरील शिष्यवृत्तींचे **ऑफलाईन अर्जाचे नमुने, शासन निर्णय, शिष्यवृत्तीबाबतची माहिती** संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

६. शिष्यवृत्तीसाठी अर्ज करतांना सदर शिष्यवृत्ती साठी शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्तीचे अवलोकन करुनच अर्ज सादर करावा.

७. शिष्यवृत्तीच्या अर्जासोबत जोडावयास सांगण्यात आलेले सर्व आवश्यक कागदपत्रांची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

८. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित खातेवर थेट जमा करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी अर्जामध्ये विहीत ठिकाणी बँकेखाते बाबत माहिती तसेच आधार क्रमांकाबाबतची माहिती अचूक भरावी. तसेच आपल्या **बँकेच्या पासबूकाची प्रथम पृष्ठाची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.**

९. अपूर्ण / चुकीची माहिती भरलेले तसेच अंतिम मुदतीनंतर प्राप्त अर्जांचा शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाणार नाही.

१०. शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला म्हणजे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळेलच असे नाही. शासनाने वेळोवेळी निश्चीत केलेल्या अटी व शर्ती पूर्ण करणारे विद्यार्थीच शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरतील.

- **महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांचेसाठी सर्वसाधारण सूचना :-**

११. सन २०१७-१८ या वर्षासाठी शिष्यवृत्तीबाबत कार्यवाही करणेसाठी कमी कालावधी असल्याने संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ यांनी सदर शिष्यवृत्तीबाबत तात्काळ विद्यार्थ्यांना सूचना देण्यात येऊन अंतिम मुदतही निदर्शनास आणून द्यावी. तसेच शिष्यवृत्तींचे अर्ज भरणेस विद्यार्थ्यांना सहाय्य करावे.

१२. शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणाचे अर्ज भरणेसाठी संबंधित विद्यार्थ्यास मागील वर्षी शिष्यवृत्ती मंजूर असणे आवश्यक आहे. सदर बाबींची खात्री करणेत यावी. **तसेच उपरोक्त क्र. ७, ८ व ९ वरील शिष्यवृत्तीचे नुतनीकरणाचे अर्ज संबंधित विभागीय सहसंचालक कार्यालयांना सादर करणे आवश्यक आहे.**

१३. विद्यार्थ्यांनी मुदतीत महाविद्यालयात सादर केलेल्या शिष्यवृत्तींच्या अर्जाची तसेच सोबत जोडलेल्या कागदपत्रांची विहीत मुदतीत पडताळणी करावी.

१४. विद्यार्थ्यांनी संपूर्ण व अचूक अर्ज भरलेला आहे तसेच सोबत सर्व आवश्यक कागदपत्रे जोडलेली आहेत या बाबींची खात्री करुनच शिष्यवृत्तीचे अर्ज पुढील टप्प्यावर पाठविण्यात यावेत.

१५. संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ यांनी पडताळणी केलेले पात्र विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीनिहाय अर्ज उपरोक्त सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यामध्ये (English Excel Format) शिष्यवृत्तीनिहाय विद्यार्थ्यांची माहिती भरुन संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ यांनी अर्जांसोबत सादर करणे आवश्यक आहे.

१६. उपरोक्त शिष्यवृत्तींची प्रभावी अंमलबजावणी करणेची जबाबदारी संबंधित प्राचार्य / संस्थाप्रमुख / कुलसचिव यांची राहील.

१७. **महाविद्यालयांनी पडताळणी केल्यानंतर शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज शिष्यवृत्तीनिहाय (नवीन मंजूर व नुतनीकरण) स्वतंत्रपणे तक्त्यात नमुद केल्यानुसार संचालनालयास / संबंधित विभागीय सहसंचालक कार्यालयांना दि. ०५.०३.२०१८ पर्यंत पोहोचतील अशा पध्दतीने (हस्तपोच, स्पीड पोस्ट आदि. प्रकारे) स्विकारले जातील.**

१८. शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती पूर्ण करणारे विद्यार्थी, ऑफलाईन शिष्यवृत्तीची माहिती न मिळाल्याने तसेच महाविद्यालयांनी मुदतीत अर्ज संचालनालयास सादर न केल्याने, वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची / विद्यापीठांच्या कुलसचिवांची राहील.

Scanned by CamScanner

१९. विभागीय सहसंचालक कार्यालयांनी वरील तक्त्यामधील अ.क्र. ७, ८ ,९ या शिष्यवृत्ती योजनांचे नुतनीकरणाचे अर्ज तसेच अ.क्र. १० व ११ या शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज तपासणी करुन पात्र असलेल्या लाभार्थी विद्यार्थ्यांची यादी सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यामध्ये (हार्ड व सॉफ्ट कॉपी) संचालनालयास **दि. १०.०३.२०१८** पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

सन २०१७-१८ या वर्षासाठी शिष्यवृत्तीच्या कार्यवाहीसाठी कमी कालावधी उपलब्ध आहे. त्यामुळे सदरहू शिष्यवृत्तीच्या ऑफलाईन कार्यवाही तसेच अंतिम मुदत याबाबत आपल्या अधिनस्त महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांना तात्काळ इमेल, दुरध्वनी, परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात याव्यात. तसेच शिष्यवृत्ती योजनेची पूर्वीप्रमाणे ऑफलाईन पध्दतीने अंमलबजावणी होत असलेबाबत आपल्या विभागातील जिल्ह्यांमधील स्थानिक वर्तमानपत्रामध्ये मोफत बातमी देणेत यावी.

**(डॉ.धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

प्रत,

माहिती व पुढील कार्यवाहीस्तव

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
२. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे ०५
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई ०१
४. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
५. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे -०१
६. संचालक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -०१
७. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे

२/- उपरोक्त शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावे. तसेच आपल्या अधिनस्त विभागांना सूचना देण्यात याव्यात.

Scanned by CamScanner

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि. रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४६१४२०)


जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०२२/ 1847 दि. 29/7/22

प्रति,
प्राचार्य / संस्था प्रमुख,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

**विषय: १०० टक्के केंद्र पुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०२२-२३ साठी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ: मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्य-२०२२-२३/सीएसएस/१००४७, दि.२७.०७.२०२२

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन (Fresh) मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी नवीन (Fresh) मंजूरीचे आणि नुतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

**केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी (Fresh) व नुतनीकरणासाठी (Renewal) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दि.३१ ऑक्टोबर, २०२२ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.**

शिष्यवृत्ती बाबतच्या संकेतस्थळावरील मार्गदर्शक सूचना (Guidelines) व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व विद्यार्थी व महाविद्यालयांना कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नवीन / सुधारीत प्राप्त सूचनांसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे व मा.संचालनालयाच्या www.dhepune.gov.in संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी करावे.

➢ **किमान पात्रता व अटी:**

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती / स्टायपेंडचा लाभाथी नसावा.
३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिकउत्पन्न ४.५ लाखापेक्षा अधिक नसावे.
४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणत्याही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राव्दारे व दूरस्थ शिक्षणासाठी (Deploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.
५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्ष व वैद्यकिय अभ्यासक्रमासाठी व कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत देय राहील.

- **अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे:**
  - **नवीन मंजूरी (Fresh)**
    १. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका.
    २. पालकांचे राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
  - **नुतनीकरण (Renewal)**
    २. मागील वर्षाची गुणपत्रिका.

- **नवीन मंजूरी आणि नूतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती:-**

१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नुतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. **विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि.३१.१०.२०२२ ही आहे व महाविद्यालयांनी अर्जांची पडताळणी करण्याचा अंतिम दि.१५.११.२०२२ हा आहे.**

३. नवीन मंजूरीसाठी (Fresh) SSC, CBSE व ICSE बोर्डचे Top २०th Percentile Merit List मधील सर्व विद्यार्थी या योजनेचा अर्ज करण्यास पात्र असतील. सदर शिष्यवृत्तीसाठी उच्च शिक्षण कार्यालयामार्फत केवळ उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची SSC बोर्डच्या विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

४. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक या पर्यायाचा वापर करुन अर्ज भरावा. आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी अशा विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोड करुन अर्ज भरावा.

५. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.

६. विद्यार्थ्यांचा बँक खाते चालू स्थितीत (Operative / Active Mode) असणे आवश्यक आहे. जेणेकरुन शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

७. **विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वत:च्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे.** खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील.

८. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (Standard Operating Procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

९. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावी.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / शिक्षण संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या / शिक्षण संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा.

११. एखादा पात्र विद्यार्थी नुतनीकरणासाठी अर्ज करावयाचा राहीला असेल तर पुढील वर्षी अर्ज करण्यास पात्र असेल. (परंतू ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)

१२. एखाद्या पात्र विद्यार्थ्यांचा नुतनीकरणासाठी अर्ज महाविद्यालय स्तरावर पडताळणी करावयाचा राहीला असेल तर अशा सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्षी योजनेसाठी अर्ज करता येईल. (परंतू ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)

विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा (Fresh) किंवा नूतनीकरणाचा (Renewal) चा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जाची छाननी करुन ऑनलाईन मंजूरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी. तसेच मंजूर केलेले अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे जतन करुन ठेवण्यात यावीत व तपासणी अंती समितीस उपलब्ध करुन देण्यात यावीत. संबंधित महाविद्यालयांनी विभागाने दिलेल्या युजर आयडी व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच (अंतिम दिनांकाची वाट न पाहता) पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०२२-२३ ही योजना राज्यात यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्व महाविद्यालयांनी याबाबत Banners महाविद्यालयाच्या प्रवेशव्दारावर दर्शनी जागेवर लावावेत. तसेच Online / Offline Seminar, SMS, WhatsApp Message, Website इत्यादी सर्व माध्यमांतून विद्यार्थ्यांना माहिती देण्यात यावी. तसेच विद्यार्थ्यांना येणाऱ्या

अडचणींचे निराकरण करण्यासाठी महाविद्यालय स्तरावर एका नोडल ऑफिसरची नेमणूक करावी आणि विद्यार्थ्यांना शक्य त्या सर्व मार्गांनी मदत करणे आवश्यक आहे. तसेच या शिष्यवृत्तीपासून एकही पात्र विद्यार्थी वंचित राहणार नाही याबाबत सर्व महाविद्यालयांनी योग्य ती दक्षता घ्यावी. अन्यथा याबाबत काही तक्रार उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयांची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ.संजय जगताप)
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रत:

मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.